# अधिसूचना

**क्र.अका./उजि(भुसं.क्र,३)वि.पा.वि.म./कावि ०८ /२०२२**
**जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर**
**दिनांक -०८/०१/२०२२.**

भुमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ ( महाराष्ट्र सुधारणा अधिनियम २०१८)अन्वये कलम ११(१)खालील अधिसूचना

**मौजा – पुल्लर प.ह.नं. ७६ ता. भिवापूर जि. नागपूर**
**भुसंपादन प्रकरण क्रं-०१/अ-६५/२०१९-२०**

ज्याअर्थी, भुमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) याच्या कलम ३ च्या खंड (इ)च्या परंतूकाव्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून काढण्यात आलेली शासकीय अधिसुचना, महसुल व वनविभाग क्रमांक संकिर्ण-११/२०१४/प्र.क्र.७७/अ-२ दिनांक १९ जानेवारी,२०१५ (यात यापूढे जिचा निर्दश उक्त अधिसुचना असा करण्यात आलेला आहे.) याव्दारे असे सुचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (झेड ओ) मधे व्याख्या केलेल्या एखादया सार्वजनीक प्रयोजनासाठी, एखादया जिल्हयातील ५०० हेक्टर पेक्षा अधिक नसेल ईतक्या क्षेत्राकरीता जमीन संपादन करण्याच्या संमंधात, अश्या जिल्हयाचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचीत शासन असल्याचे मानन्यात येईल.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसुचनेनुसार समुचीत शासन असलेल्या, नागपूर जिल्हयाच्या जिल्हाधिकाऱ्यास यासोबत जोडलेल्या अनुसूची १ मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेली जमीन ( यात यापूढे जिचा निर्दश “ उक्त जमीन” असा करण्यात आलेला आहे.) सार्वजनीक प्रयोजनासाठी,(यात यापूढे ज्याचा निर्दश “सार्वजनीक प्रयोजन” असा करण्यात आलेला आहे.) आवश्यक आहे अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे असे वाटते ज्याच्या स्वरूपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसूची २ मध्ये दिलेले आहे आणी म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोटकलम (१) च्या तरतूदीन्वये याव्दारे असे अधिसुचीत करण्यात येते की, उक्त जमीनीची उक्त सार्वजनीक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

आणी ज्याअर्थी प्रस्तावित भुमी संपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तीचे विस्तापण करण्यास भाग पाडणारी कारणे यासोबत जोडलेल्या अनूसुची ३ मध्ये दिलेली आहे.( विस्थापण होणार असेल तर याअनुसूचीमध्ये कारणे नमुद करावी.)

आणी ज्याअर्थी सामाजीक परीणाम निर्धारण सारांश यासोबत जोडलेल्या अनुसूची ४ मध्ये दिलेला आहे.

आणि ज्याअर्थी, कलम ४३ च्या पोटकलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत याप्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशिल यासोबत जोडलेल्या अनुसुची ५ मध्ये दिलेला आहे.( नियुक्त करणे आवश्यक असेल तर या अनुसुचीमध्ये तपशिल नमुद करावा.)

त्याअर्थी आता असे घोषीत करण्यात येत आहे की, उक्त अधिनीयमाच्या कलम ११ च्या पोटकलम(४) अनुसार कोणतीही व्यक्ती, ही अधिसुचना प्रशिध्द झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनीयमाच्या प्रकरण ४ खालील कार्यवाही पुर्ण होईल त्या कालावधीपर्यंत उक्त जमीनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमीनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही.

परंतू, उक्त जमीनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर जिल्हाधिकाऱ्यास विशेष परीस्थितीची कारणे लेखी नमुद करून अशा मालकास उपरोक्त तरतूदीच्या प्रवर्तनातून सुट देता येईल.

परंतू आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतूदीचे बुध्दी परस्पर उल्लंगन केल्यामुळे तिला झालेला कोणत्याही हाणीची किंवा क्षतीची जिल्हाधिकाऱ्याकडून भरपाई दिली जाणार नाही.

तसेच अधिनीयमाच्या कलम ११ च्या पोटकलम ५ नुसार जिल्हाधिकारी भुसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम २०१४ (यात यापूढे ज्याचा निर्देश "उक्त नियम" असा करण्यात आलेला आहे.) त्यांच्या नियम १० च्या उपनियम (३) व्दारे विहीत केल्याप्रमाने भुमी अभिलेखाच्या अद्यावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे देखील घोषीत करण्यात येत आहे.

आणी ज्याअर्थी उक्त अधिनीयमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचीत शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनीयमाखाली जिल्हाधिकाऱ्यांची कार्य पार पाडण्यासाठी **श्रीमती शिवनंदा लंगडापूरे उपजिल्हाधिकारी (भुसंपादन क्रमांक -३), विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ नागपूर** यास पदनिर्देशीत करीत आहे.

## अनुसूचि-एक
## जमिनीचे वर्णन
### गाव :- पुल्लर, तालुका :- भिवापूर, जिल्हा :- नागपूर
### भुसंपादन प्रकरण क्रमांक :- ०१/अ-६५/२०१९-२०२० प.ह.नं. ७६.

| अ.क्र. | सर्व्हे क्र. | संपादनाखालील क्षेत्र (अदमासे हे.आर मध्ये.) |
|---|---|---|
| १ | १६२/१ | ०.५२ |
| २ | १६२/२ | ०.९४ |
| ३ | १६२/३ | ०.०४ |
| ४ | १६४/१ | १.०० |
| ५ | १६५/१ | १.२१ |
| ६ | १६५/२/१ | १.३६ |
| ७ | १७१/१ | ०.२९ |
| ८ | १७५ | ०.२२ |
| ९ | १८० | ०.२० |
| १० | १८१/१ | ०.१५ |
| ११ | १९२/१ | ०.८५ |
| १२ | १९४/१ | ०.१७ |
| १३ | १९४/२ | ०.०३ |
| १४ | १९५/१ | ०.२० |
| १५ | १९७ | ०.५९ |
| १६ | १९९ | ०.१० |
| १७ | २००/१ | ०.३० |
| १८ | २००/२ | ०.२० |
| १९ | २०१/१ | ०.८५ |
| २० | २०९/१ | ०.२० |
| २१ | २१०/१ | ०.२५ |
| २२ | २११ | ०.१० |
| २३ | १५९/३-१ | ०.०६ |
| | एकूण | ९.८३ |

## अनुसूची—दोन
### सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण

प्रकल्पाचे नाव :- **गोसेखुर्द प्रकल्प**

प्रकल्पकार्याचे वर्णन :- **गोसेखुर्द धरणाअंतर्गत बुडीत क्षेत्रात समाविष्ट करण्याबाबत**

समाजाला मिळणारे लाभ :- **गोसेखुर्द राष्ट्रीय प्रकल्याअंतर्गत असुन योजनेची सिंचन क्षमता निर्मीतीचे उध्दीष्ट साध्य करणेसाठी संपादन पुर्ण करणे आवश्यक आहे व याचा लाभ शेतीसाठी सार्वजनीक पाणीपुरवठा व उद्योगधंदे करीता होणार आहे.**

## **अनुसूची–तीन**

बाधित व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे:- **विस्थापीत होत नाही.**

## **अनुसूची–चार**

| | |
|---|---|
| (सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणाऱ्या अभिकरणाने दिलेला) सामाजिक प्रभाव निर्धारणाचा सारांश | भुमी संपादन व पुर्नस्थापणा करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनीयम २०१३ चे कलम १०(क) अन्वये महाराष्ट्र शासन महसुल व वनविभाग मंत्रालय मुंबई यांची अधिसुचना दिनांक १३ मार्च, २०१५ नुसार उक्त अधिनीयमाचे प्रकरण २ व ३ यांच्या तरतूदी लागू करण्यापासून सुट देण्यात आली आहे. |

## **अनुसूची–पाच**
### **नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशिल**

अ. प्रशासक म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या अधिकाऱ्याचे पदनांम :- निरंक

आ. प्रशासनाच्या कार्यालयाचा पत्ता :- निरंक

इ. ज्या अधिसुचनेव्दारे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे त्या अधिसुचनेचा तपशिल :-निरंक

**टिप :-** उक्त जमिनीच्या आराखडयाचे **उपजिल्हाधिकारी (भुसंपादन क्र.३) विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ,नागपूर** यांचे कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

ठिकाण :- नागपूर
दिनांक :- ४/०१/२०२२

उपजिल्हाधिकारी भुसंपादन
**क्रमांक-३,वि.पा.वि.म.,नागपूर**